# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४**

## महसूल व वन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०२९, जमीन महसूल**<br>**रूपये:- २७,२८,१०,८९,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (१) | ६३५५ | १०० | राज्यात पालघर जिल्ह्यात मौजे वेवजी ता. तलासरी येथील स.न. २०४/१ बाबत आकार बंद प्रमाणे ४.६४.० हे. आर असे असा सद्यस्थिती असलेले संगणाकृत ७/१२ मध्ये सर्व ७/१२ चा मेळ घेतला असता क्षेत्र ४.२६.० हे.आर असून हस्तलिखित ७/१२ मध्ये असलेला पोट खराबा क्षेत्र ०.३७.० हे.आर.नोंद संगणीकरण करणे कमी राहून गेलेली असणे, उक्त नोंद ही कलम १५५ अन्वये घेण्याची तलाठी सजा वेवजी यांना सूचना देण्यात आलेली असणे, त्याप्रमाणे सादर बाबत क्षेत्राचा मेळ घेतला असता तो जुळता असणे, रस्त्या करिता संपादित झालेले जमिनीबाबत गावी फेरफार क्र.१४४ दि १६/०१/१९४६ रोजी नोंद झालेली असणे, त्या अन्वये क.ज.प.ने. रस्त्या करिता ५ एकर ३० गुंठे जमीन संपादित झालेली दिसते. परंतु सदर फेरफारा क्र.१४४ चा अंमल आज रोजी पर्यंत दिलेला नसणे, मुळ मालकाचे क्षेत्र २.८८.१० हे.आर. मधून कमी करून रस्त्या करिता संपादित जमीनचा ५ एकर ३० गुंठे जमिनीचा ७/१२ उतारा घडविण्याचे आदेश करण्यात यावेत अशी मागणी होत असणे, याबाबत मागणील अधिवेशनात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झालेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६३५७ | १०० | पालघर जिल्ह्यातील वाकडी (ता.जि.पालघर) येथील श्रीमती शालिनी जाधव व इतर आदिवासींना मुंबई-बडोदरा द्रुतगती महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापही मिळालेला नसणे, सदर आदिवासींना जमिनीचा मोबदला देण्यास टाळाटाळ करणा-या अधिका-यांची चौकशी आवश्यकता असणे, मुंबई-बडोदरा द्रुतगती महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या पालघर जिल्ह्यातील उक्त प्रकल्पग्रस्तांना तातडीने जमिनीचा मोबदला देऊन आदिवासी महिला व इतर यांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (३) | ६५०३ | १० | चांदोली पर्यटन विकासा करीता पाटबंधारे विभागाकडील चांदोली बुद्रुक येथील 47 हेक्टर जमीन वनविभागाकडे हस्तांतर होवून मिळणेबाबत या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. अ/सर्वे/554. दिनांक 09.12.2022 थे पत्राद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांना विनंती करण्यात आली होती. सदर जमीन ताब्यात मिळताच प्रस्ताव सादर करण्याची तजविज ठेवली आहे.तसेच या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.अ.संकीर्ण/412 दिनांक 27.09.2022 व.जा.क्र.अ/योजना/चांदोली पर्यटन/ 722/2023-24 दिनांक 05.12.2023 अन्वये, क्रोकोडाईल पार्क संदर्भात अभ्यास गट तयार करून ओरीसा व तामिळनाडू राज्यातील प्रकल्पांना भेटी देणेबाबत मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना आर्थिक खर्चाचे विवरण पत्र पाठविले होते. सदर दौरे होणे आवश्यक असून निधी प्राप्त होताच दौ-याचे नियोजन असून याबाबत लवकर प्रस्ताव सादर करण्याची तजवीज ठेवण्यात येत आहे. तसेच पाटबंधारे विभागाकडील जमीन हस्तांतराची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व अभ्यास गटासाठी आवश्यक निधी प्राप्त झाल्यांनतर क्रोकोडाईल पार्क करीता प्रस्ताव सादर करण्याची तजविज केली असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (४) | ६४२७ | १० | मुंबई, गोरेगांव (पूर्व), आरे वसाहतीत दुग्ध वसाहत स्थापनेच्या पूर्वीपासून २७ आदिवासी पाड्यांमध्ये आदिवासी लोक शेती व्यवसाय करुन अद्यापही रहात असून शासनाच्या नियमानुसार जमिनीचा कर अदा करीत आहेत. वन घोषीत केलेल्या आरे वसाहतीत आदिवासी बांधवांनी वैयक्तिक तथा सामुहिक अनेक दाखल केलेले वन हक्काचे दावे निकाली काढण्याकरिता शासनाच्या दुर्लक्षामुळे अद्याप विभागस्तरीय समिती स्थापन होऊ न शकल्याने अद्यापही प्रलंबित असणे, त्यातच हबेलपाडा येथील आदिवासींचे वन हक्क दावे फेटाळल्याने त्यांच्यावर अन्याय होणे, वन कायद्याचे कलम ४ प्रमाणे आदिवासी बांधवांनी हरकती नोंदविलेल्या असून आदिवासी बांधवांचे जमिनीचे हक्क संविधानाचे कलम १३(३) प्रमाणे स्थापीत करीत असेल तर आदिवासी बांधवांचे ठराव घेऊन पंचनामे घेऊन सदर कसत असलेल्या जमिनीचे हक्क तात्काळ आदिवासी बांधवांना सुपूर्द करण्याची मागणी आदिवासी हक्क संवर्धन समिती, आरे, मुंबई यांनी शासनाकडे करण्यात येणे, तसेच आदिवासी पाडे वन विभागातून वगळण्याकरिता सीमांकनाच्या कामात प्रशासनाचे कर्मचारीच सोयीनुसार मनमानी करुन हद्द निश्चित करीत असल्याने आदिवासींची हद्दीवरील वाघया (वाघदेव) आणि गावाचे रक्षण करणारा गांवदेव या आस्थेशी जोडलेले पुजनीय देवस्थान पाड्यात असावे, अशी आदिवासी हक्क संवर्धन समितीने मागणी केली असणे, येथील २७ आदिवासी पाड्यांना गावठाणाचा दर्जा देऊन घरकूल योजना राबविण्याची आदिवासींनी मागणी करण्यात येणे, तसेच पर्यावरणाचा ऱ्हास न होता समतोल राखण्याकरिता |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | येथील जैवविविधतेचे संरक्षण करुन नवीन प्रकल्पाला मंजूरी देऊ नये अशी मागणी, येथील आदिवासी समितीने शासनाकडे करण्यात येऊनही अद्याप यावर शासनाने कोणतीच कारवाई न करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६४४१ | १० | जि.सातारा,ता.महाबळेश्वर,येथील जंगलातील निसर्ग आणि पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असलेल्या कांदाटी खोर्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या झाडाणी गावातील ६४० एकर जमीन नंदुरबारचे जीएसटीचे मुख्य आयुक्त असलेले चंद्रकांत वळवी, आदित्य वळवी, अनिल वसावे, प्रफुल्ल चंदन आदी १३ उच्च पदस्थ सरकारी अधिकार्यां नी शेतकऱ्यांची दिशाभूल फसवणुक करुन केवळ ८ हजार रुपये एकर या कवडीमोल दराने ६४० एकर जमीन खरेदी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, अनेक शेतकर्यांना अद्याप जमीनीची मोबदला रक्कम न देता धमकाविण्यात येणे, झाडाणी परिसरात जमीन घेतल्यापासुन तीन वर्षापासुन संवेदनशील क्षेत्रात कमाल मर्यादेपेक्षा अधिक जमिनीची खरेदी करणे, त्यावर नियमबाह्य पद्धतीने बांधकाम करणे, निसर्गातील हस्तक्षेप, वृक्षतोड, अनधिकृत बांधकाम, मोठ्या प्रमाणात उत्खनन करणे, पर्यावरणीय दृष्ट्या अतिसंवेदनशील भागात शासनाची कोणतीही परवानगी न घेता व पर्यावरण कायद्याचे उल्लघंन करुन जमीन खरेदी करुन त्यावर अनधिकृत बांधकाम केल्याचा प्रकार उघड होणे, सदर प्रकरणी कारवाई करण्यावर मर्यादा आहेत, यातील अतिरिक्त जमीन शासन जमा केली जाईल, अवैद्य बांधकामावर केवळ दंडात्मक कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात येऊनही अद्याप यावर चौकशी अहवालानुसार प्रत्यक्षात कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, दरम्यान वडिलोपार्जित जमिनी बळकाविणाऱ्यांनी वळवी आणि त्यांचे नातेवाईकांवर गुन्हा दाखल करावा, फसवून घेतलेल्या जमिनी परत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६४५० | १० | राज्य शासनाने शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना वर्ग-2 मधून वर्ग-1 मध्ये (मालकी हक्क) रुपांतर करण्यासाठी ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था रेडीरेकनरच्या १५ टक्के दराने भूखंडाचा मालकी हक्क संपादन करण्यास इच्छूक आहेत अशा संस्थांना आणखीन ३ महिने म्हणजेच ७ जून २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचे पत्रक महसूल विभागाच्या उप सचिवांनी दि.0६.03.2024 रोजी जारी केले असणे, रेडीरेकनरच्या 15 टक्केऐवजी ५ टक्के दराने भूखंडाची किंमत अदा करण्याची सवलतीची लोकप्रतिनिधींच्या फेब्रुवारी २०२४च्या अधिवेशनात केलेली मागणी मा.महसूल मंत्र्यांनी मान्य करुनही अद्यापपर्यंत शासनाने ५ टक्के दराने भूखंडाची किंमत आकारण्याबाबतचा सवलतीचा निर्णय जारी न करणे, शासनाच्या 15 टक्के भूखंडाच्या किमतीच्या दरास शासनाने मुदतवाढ दिल्यामुळे त्याचा मुंबईसह राज्यातील हजारो गृहनिर्माण संस्थांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नुकसान होणार असल्याने याबाबत ५ टक्के सवलतीच्या दराचा निर्णय घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- २७,२८,१०,८९,०००/-**<br>**ॲड. अशोक पवार** |
| (७) | ६४१७ | १० | हवेली तालुक्यातील ( जि.पुणे ) पूर्व भागातील महसूल मंडळामधील वाघोली, उरळी कांचन, थेऊर आणि कळस या चार महसूल मंडळाकरिता स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी वर्ग नसणे, या चार मंडळामधील गावाची लोकसंख्या अंदाजे 5 ते 6 लाख असून या गावामध्ये शेतकरी वर्ग जास्त असणे, तसेच ही गावे शहरा लगत असल्याने दिवसेंदिवस नागरीकरण वाढत असल्याने नागरिकांना शासकीय कामाना अडचणी निर्माण होत असून कामामध्ये दिरंगाई होत असल्याने दिवसेंदिवस तक्रारी वाढत असणे, पूर्व हवेली तालुक्यातील नागरिकांना हवेली तहसिल कार्यालय शुक्रवार पेठ, पुणे येथे येण्याकरिता वाहतूक कोंडीच्या समस्येचा सामना नागरिकांना करावा लागत असणे, मौजे कदमवाकवस्ती ता. हवेली जि. पुणे येथील गट नं. 177 मधील क्षेत्र पो.ख.4.39 आर. येथे नविन अप्पर तहसिल कार्यालय होणेबाबतचा प्रस्ताव शासन स्थरावर प्रलंबित असणे, परंतु शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (८) | ६३२० | १० | मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) मौ.मालवणी, ता.बोरिवली येथील सर्वे नं.२१८ पै, २६३ पै, २६५ पै, मौजे-मार्वे, ता.बोरिवली येथील सर्वे नं.५०,६०,६१ व मौ.आक्से येथील सर्वे नं.१५,१६ पै. व १४/अ पै. एकूण क्षेत्र ११४ एकर ८ गुंठे ४ आणे, सदरची जमीन तत्कालीन जिल्हाधिकारी ठाणे यांनी नवसाध्य करण्यासाठी दिर्घ मुदतीकरीता भाडे पट्टयाने मे. इंडिया फार्मसी प्रा.लि. या कंपनीला अटी व शर्तीवर देण्यात आली असणे, करार नामा केला असणे, भाडे पट्टेदार यांनी शर्त भंग केला असणे, त्यामुळे शासनाने जमीन ताब्यात घेतली असणे, करार नाम्यातील मुख्य अटीला छेद दिला असणे, इंडियन बँकेकडून १ कोटी कर्ज घेतले असणे, शासनाची जमीन परस्पर पर्यटन विभागाल दिली असणे, मे.जे.वी.होल्डिंग प्रा.लि.कंपनी शिलाँग मेघालय यांना भागीदार करुन घेतले असणे, मे. इंडिया फार्मसी प्रा.लि.कंपनीने त्रयस्त पक्षाचे हित जोपासले असणे, परिणामी शासनाची ७०९ कोटी रुपयाची फसवणूक झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | ६३२४ | १० | मौ. झाडाणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा या भागातील ६४० एकर जमीन असून ती जमीन कांदारी खोऱ्यातील व व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत असणे, सदरची जमीन उच्च पदस्थ सरकारी अधिकाऱ्यासह १३ जणांनी अल्प दरात खरेदी केल्याचे उघडकीस आले असणे, जमीन निसर्ग आणि पर्यावरणदृष्टया संवेदनशील क्षेत्रात असणे, कांदारी खोरे हे घनदाट अरण्याचा भाग असणे, याठिकाणचे निसर्गसंपदेचे महत्व असणे, याप्रकरणी स्थानिक रहिवाशांनी जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार केली असणे, या व्यवहारात गैरप्रकार झाला असल्याचे निदर्शनास आले असणे, संवेदनशील क्षेत्रात कमाल मर्यादेपेक्षा अधिक जमीन खरेदी व त्यावर नियमबाहय बांधकाम करणे, निसर्ग संपदेत हस्तक्षेप केला असणे, वडिलोपार्जित जमीन परत करण्यात याव्यात व गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१०) | ६३२५ | १० | वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ०१ मौजे शिरगाव-चंदनसार विरार पु. गुरचरण सर्व्हे नं. ३५१, ३५२ तसेच लगतच्या सर्व्हे नं. २८, २९, ३० मध्ये राजरोसपणे अनधिकृत दगड उत्खनन ब्लास्टिंग मागील काही वर्षापासून सुरु असणे, परिणामी सदरहू उत्खन्नात केल्या जाणाऱ्या स्फोटकांचा वापर आणि ब्लास्टिंगमुळे शिरगाव गावातील बहुतांश घरांना, भिंतींना तडे जाऊन कधीही घरे कोसळून अपघात होण्याची शक्यता ह्यापुर्वीही सदरहू अनेकदा ब्लास्टिंगमुळे हादरे बसून शिरगाव सईपाडा (डोंगरीपाडा) येथील आदिवासींच्या घरांना तडे जाऊन घरे कोसळून जिवीतहानी झालेली असणे, त्याचबरोबर जिल्हा परिषदेची मराठी शाळा कोसळून सुद्धा तत्कालीन तहसिलदार व महानगरपालिका यंत्रणांना कळविण्यात आलेले असतानाही त्याकडे दुर्लक्ष करुन कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे, ह्याबाबतीत भूमाफियांचे अनधिकृतपणे शिरगाव-गडगापाडा या परिसरातील रस्त्यालगत अवैध दगड क्रशर मशीन प्लॉट तात्काळ ब्लास्टिंग बंद करुन घराचे नुकसान झालेल्या बाधितांना नुकसान भरपाई देणेबाबत सदर अवैध दगड उत्खनन करणाऱ्या भुमाफीयां विरोधात कोणतेही कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत तसेच विनाविलंब दगड उत्खननाला कायस्वरुपी आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५२, सचिवालयीन-सर्वसाधारण सेवा**<br>**रूपये:- ५७,२६,७३,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (११) | ६५०७ | १० | पुरंदर, जि. पुणे तालुक्यातील उपअधिक्षक भूमिअभिलेख कक्षामध्ये पुरंदर तालुक्यातील जमिनीबाबत इ.स.१८०० पासूनचे कागदपत्रे उपलब्ध असून सदर कागदपत्रे सुस्थितीत व अत्यंत जीर्ण अवस्थेत असणे, आजच्या आधुनिकयुगात देखील नागरिकांना कागदपत्रांची मागणी केली असता मुळ कागदपत्रे सुस्थितीत व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अत्यंत जीर्ण अवस्थेत असणे, आजच्या आधुनिकयुगात देखील नागरिकांना कादपत्रांची मागणी केली असता मुळ कागदपत्रे हाताळून त्यांची बाहेरुन झेरॉक्स काढून आणून सर्टीफाईड प्रत दिली जात असल्यामुळे सदर कागदपत्रे जीर्ण झाल्याने व फाटण्याचे प्रमाण वाढत चाललेले असणे, सदर कागदपत्रे जीर्ण झाल्यानंतर तालुक्यातील नागरिकांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होत असणे, सद्या विमानतळ, पालखी महामार्ग व आपआपासातील जमिनीचे वाद वाढल्याने मोजणी व इतर कारणांकरिता वारंवार कागदपत्रांची आवश्यकता असतांना दस्ताऐवज डिजीटल स्वरुपात करणे गरजेचे असुन याबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्याने याबाबत राज्यशासनाने तातडीने निर्णय घेऊन पुरंदर तालुक्यातील भूमिअभिलेख कक्षातील दस्ताऐवज डिजिटल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- ५७,२६,७३,०००/-**<br>**ॲड. अशोक पवार** |
| (१२) | ६४१६ | १० | हवेली तालुक्यासाठी लोणी काळभोर (जि.पुणे) येथे अप्पर तहसील कार्यालय एक वर्षापूर्वी मंजूर झाला असणे, परंतु अद्यापही सदर अप्पर तहसील कार्यालय बांधकामासाठी निधी मंजूर न होणे, हवेली तालुक्याची लोकसंख्या मोठी असुन दिवसेदिवस लोकसंख्या वाढत असणे, परंतु येथे प्रशासकीय इमारत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असणे, सदर प्रशासकीय इमारत झाल्यास या कृषी विभाग, दुय्यम् निबंधक, सहाय्यक निबंधक, भूमि अभिलेख इत्यादी कार्यालय एकाच इमारतील आल्याने नागरिकांना त्याचा फायदा होणे, तरी हवेली तालुक्यासाठी लोणी काळभोर (जि.पुणे) येथे अप्पर तहसील कार्यालयासाठी निधी मंजूर करण्याची आवश्यकता, तरी शासनाकडे वारंवार मागणी करुन कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे नागरिकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२५०, इतर सामाजिक सेवा**<br>**रूपये:- ५५,३३,४२,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१३) | ६३२२ | १० | मढ कोळीवाडा, वांजरे गल्ली मालाड (पश्चिम) मुंबई येथील कोळी बांधवाची मढ दर्यादील मच्छिमार सहकारी संस्थेची सेंट पीटर मासेमारी नौका दिनांक १८ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास मासेमारी करण्यासाठी गेली असणे, त्याच वेळेस दुसऱ्या मासेमारी नौकने सेंट पीटर या नौकेला धडक दिली असणे, त्यामुळे नौकेचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मोठयाप्रमाणात नुकसान झाले असणे, परंतु शासनाने पंचनामा केला नसणे, तसेच आर्थिक मदतही दिली नसणे, आर्थिक मदत देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य**<br>**रूपये:- ७८,३९,१०,८९,०००/-** |
| | | | **श्री. सुभाष धोटे** |
| (१४) | ६३७४ | १० | माझे राजुरा (जिल्हा चंद्रपूर) मतदार संघात माहे १९ मार्च २०२४ रोजी राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने गहू, मिरची, ज्वारी, हरभरा या रब्बी पिकांचे व पाले भाज्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. ग्रामीण भागात अनेक घरांचे छप्पर उडाले असून शेतकऱ्यांचे पाळीव जनावरे सुध्दा मृत्यू पावली आहे. तर ग्रामीण भागातील शेतातील उभी पिके नष्ट झाले आहे. अगोदरच नापिकी झाल्याने व पिकांना कवडी मोल भाव मिळाल्याने शेतकरी हवालदिल झालेला असून अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थीक संकटात सापडलेला असतांना सुध्दा शेतकऱ्यांना शासनाकडून अघापही नुकसान भरपाई मिळालेली नसल्यामुळे त्यांच्या पसरलेले तीव्र असंतोष परिणामी तातडीने निधी उपलब्ध करुन शेतकऱ्यांना व नुकसान ग्रस्ताना मोबदला मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१५) | ६५१२ | १० | गडचिरोली जिल्ह्यातील, कियर, ता. भामरागड येथील श्री. गोंगलू रामा तेलामी हा शेतकरी दिनांक २५ एप्रिल, २०२४ रोजी शेतात वाळत घातलेल्या मोहफुलाची राखण करीत असताना अचानक घनदाट जंगलातून आलेल्या रानटी हत्तीने त्यांना सोंडेने उचलून जमिनीवर आदळले व तद्नंतर पायाखाली चिरडल्यामुळे या शेतकऱ्याचा मृत्यू झालेला असणे, मयत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना शासन निर्णयाप्रमाणे आर्थिक मदत देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ६५१४ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी, सावली व सिंदेवाही या तालुक्यात माहे एप्रिल २०२४ मध्ये झालेल्या अवकाळी व गारपिटीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने पंचनामा करुन आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केलेली असणे, तरी ३ महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही अद्यापही आर्थिक मदत मिळाली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१७) | ६३२६ | १० | माहे मे, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात अवकाळी व वादळी पावसामुळे नागरिकांचे साडे दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याने नागरिक त्रस्त असणे, या वादळी पावसामुळे घरे, जनावरांचे गोठे, दुकान गाळे व इमारतींवरील पत्रे उडाल्याने विविध गावातील अंशत: नुकसानीचे ५५ पंचनामे महसूल विभागाने पूर्ण करणे, यावर्षी कलमांना मोहर कमी आला त्यातच अल्प फळधारणा आणि उत्पादन काढत असतांना आलेला वादळी पाऊस त्यामुळे शेतकरी नाउमेद होऊन आंबा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने फळबागायतीदारांना मोठा फटका बसला असल्याने तात्काळ नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यांनी करुन देखील शेतकरी बागायदारांना भरपाईची आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ६३२७ | १० | पालघर जिल्ह्यात अवकाळी पावसाने झोडपून विषेषत: मोखाडा तालुक्यातील दिडशेहुन अधिक घरे जमिनदोस्त होऊन अनेक घरांचे पत्रे उडाले आदिवासींचे संसार वाऱ्यावर पडले असून शेतीचीही पार वाट लागून नुकसान ग्रस्त शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित असणे, मोखाडा तालुक्यात २२५ हुन अधिक गावपाडे असून १३ तलाठी सज्ज, पंचनाम्यासाठी आवश्यक असतांना केवळ चारच तलाठी कार्यरत असल्याने नुकसान भरपाईचे पंचनामे करण्यात आलेले नसणे, त्यामुळे अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे त्यांना मनस्ताप सहन करावा लागणे, पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी अवकाळी पावसाची दखल घेऊन नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात येऊन सुद्धा मोखाड्यातील नुकसानीचे पंचनामे करण्यास मनुष्यबळ नसल्याने आदिवासी शेतकऱ्यांना पंचनामे होईपर्यंत ताटकळत रहावे लागणे, परिणामी आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक होणे, आदिवासींचे जनजीवन विस्कळीत झाल्याने नुकसानीचे शासनामार्फत सर्वेक्षण व पंचनामे करुन तात्काळ नुकसान भरपाई शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**रूपये:- २८,९९,४१,३७,०००/-**<br>**श्री. जयंत पाटील** |
| (१९) | ६५०४ | १० | मागील अधिवेशनामध्ये सांगली जिल्ह्यातील वाळवा शिराळा व कोल्हापूर जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये बिबट्या व अन्य वन्य प्राण्यांचा वावर वाढला आहे. तसेच बिबट्याच्या हल्ल्यात जिवितहानी देखील झाली होती. यामुळे या भागातील नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२०) | ६४३६ | १० | "मुंबईतील मालाड पूर्व, दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील संजय गांधी उद्यानालगतच्या क्षेत्रात संरक्षक भिंत नसल्यामुळे न्यु दिंडोशी येथील ७७ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या परिसरात व टेरेसवर बिबट्याचा वारंवार मुक्त संचार होत असल्याचा प्रकार घडत असल्याचा प्रकार गेली अनेक वर्षापासून ते अद्याप पर्यंत घडत असल्याचे निदर्शनास येणे, यामुळे या रहिवाशी कुटुंबाच्या जिवीताला धोका निर्माण होऊन त्यांना दहशतीच्या व भितीच्या वातावरणात जीवन जगावे लागत असणे, या परिसरातील बिबट्यांना पकडण्यासाठी पिंजरे लावण्यासाठी वन विभागाकडून परवानगी घ्यावी लागत असणे, प्रस्ताव दिल्यानंतर सदरहू प्रस्ताव संजय गाधी वन विभाग कार्यालयाकडून परवानगीसाठी नागपूर वन विभागाकडे पाठविण्यात येत असणे, परंतु, या प्रक्रियेतील जाचक अटीमुळे अनेक वेळा पाठपुरा करुनही परवानगी मिळत नसल्याने येथील नागरिकांच्या सुरक्षेसाठी पिंजरा लावण्यास अडचणी निर्माण होणे, तसेच शासनाने येथील रहिवाश्यांच्या सुरक्षेसाठी पिंजरा लावण्याचे अधिकार संजय गांधी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात यावे, वन विभागाच्या संरक्षक भिंतीचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करणे आणि शिघ्रगती पथक नियुक्त करणे आणि रहिवाश्यांच्या संरक्षणासाठी अभ्यास गट समिती नियुक्त करुन तीच्या शिफारशीनुसार तातडीने कार्यवाही करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य वन संरक्षक अधिकारी ठाणे यांना दि.10.06.2024 लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे माझ्या विधानसभा क्षेत्रातील संजय गांधी उद्यानालगत असलेल्या व संरक्षक भिंत नसलेल्या व हद्दीलगत असलेल्या परिसरातील 77 इमारतीतील 500 कुटुंबियांच्या जिवीतास निर्माण झालेला गंभीर धोका, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ६४५१ | १० | जि.पुणे, जुन्नर तालुक्यातील काळवाडी येथे अंगणात खेळत असलेल्या ८ वर्षे वयाच्या रुद्र फाफाळे या लहान मुलास बिबट्याने पळवून नेऊन केलेल्या हल्ल्यात रुद्रचा मृत्यु झाल्याची घटना दि.08.05.2024 रोजी घडणे, दोनच दिवसापूर्वी पिपळवंडी येथे शेतात खुरपणी करणाऱ्या महिलेवर बिबळ्याने हल्ला केल्यामुळे महिला गंभीर जखमी झाली असून रुग्णालयात उपचार घेत असणे, यामुळे येथील ग्रामस्थ जनतेत घबराट निर्माण होऊन वन अधिकाऱ्यांच्या विरुद्ध तीव्र संताप व्यक्त करण्यात येणे, गेले पाच वर्षात जुन्नर वन विभागाच्या क्षेत्रातील पिंपळवंडी, काळवाडी, ओतूर, अहिनवेवाडी, डिंगोरे, सारणी, चिल्लेवाडी, पाचवर, नेतवड आदि परिसरात १५ हून अधिक नागरिकांचा मृत्यु होऊन ५०हून अधिक जखमी झाल्याच्या घटना घडणे, ओतुर व अन्य गांवे बिबट प्रवण क्षेत्रात येत असतानाही येथील वन परिक्षेत्र अधिकारी जुन्नर वन विभागाचे उप वन संरक्षक अधिकारी येथील ग्रामस्थ जनतेचे बिबट्याच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यास अपयशी ठरणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | बिबट निवारा केंद्राच्या विस्तारी करणाचे काम अद्यापही पूर्ण न होणे, एकंदरीतच जुन्नर, आंबेगांव, शिरुर आदि तालुक्यात १ किलो मिटर क्षेत्रात ४ ते १० बिबटे आढळून येत असून तिन्ही तालुक्यात एकूण बिबट्यांची संख्या २५०हून अधिक असल्याची शक्यता असणे, शिवाय वन अधिकारी पिंजरा लावून पकडलेले बिबटे वन परिक्षेत्रातील बिबट प्रवणक्षेत्रात न सोडता पुन्हा मानवी वसतीतील ऊसाच्या पिकांमध्ये सोडीत असल्याने या तालुक्यात बिबट्यांची संख्या मोठ्याप्रमाणात वाढून येथील स्थानिक ग्रामस्थांच्या जिवीतास निर्माण झालेला धोका, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२२) | ६३२८ | १० | चंद्रपूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोअर झोन मधील खातोडा मार्गावर वाघीणीला जिप्सीनी वेढा घातला असल्याचे उघडकीस आले असणे, भ्रमण मार्गावर अडथळा निर्माण केला असणे, त्यामुळे व्याघ्र प्रकल्पाच्या नियमाचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाले असणे, ९ जिप्सी चालकांनी उल्लंघन केल्याचे दिसून आले असणे, मात्र त्या जिप्सी वाहनचालक व मार्गदर्शक यांच्या कोणत्याच प्रकारची कठोर कारवाई केली नसणे, टी-११४ च्या वाघिणीला पुन्हा वेढले असणे, त्याचप्रमाणे दंडात्मक कार्यवाही ही केली नसणे, मार्गदर्शक तत्वे जाहिर करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ६३२९ | १० | सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात वानर माकडांची संख्या मोठ्या प्रमाणात असुन शेती, फळबागांची घरांच्या कौलाची पत्र्यांची वानरांकडुन नुकसान हात असल्याचे निदर्शनास येणे, वानरांकडून नुकसान होत असल्याने त्यावर पायबंद घालण्यासाठी शासनाच्या वन विभागाने वानरांचा सर्व्हे करणे, त्यांचे निर्बिजीकरण करणे, आणि वानरांच्या उत्पादित संख्येला रोखणे, तसेच त्यांची होणारी उत्पत्ती थांबवणे, त्यासाठी वन विभागाकडून उपाययोजना करण्यात येणार असल्याचे वृत्तपत्रातील बातमीतुन निदर्शनास येणे, सदर प्रकरणी सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामिण भागात येणाऱ्या तज्ज्ञांनी वानरांचा सर्वेक्षण करतांना प्रत्येक गावातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांना सर्वेक्षणाची माहिती देणे, वानरासंबंधी माहिती असलेल्या अनुभवाची नोंद घेणे, महत्वाचे असणे, ज्या शेतकऱ्यांचे फळबागा, शेतीचे नुकसान झालेल्यांना वानरांची नुकसान करण्याची पद्धत विचारात घेऊन ज्या शेतकऱ्यांच्या फळबागांचे शेतीचे नुकसान झालेले असताना भरपाई देण्यास शासनाकडुन अडचणी त्यामुळे शेतकरी बागायतदारांना होणारा त्रास कायमस्वरुपी बंद करण्याच्या दृष्टीने शासनाच्या वन विभागाने लवकरात लवकर कार्यवाही करावी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
| --- | --- | --- | --- |
| | | | यासाठी शेतकरी व कामगार संघटनेच्या जिल्हाध्यक्षांनी उप वन संरक्षकांना निवेदन दिल्याचे दि. ३० मे २०२४ रोजी आढळून येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ५ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई